महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - २०

यवतमाळ (जि.यवतमाळ) शहरात HRCT चाचणीसाठी भरमसाठ शुल्क आकारले जात असल्याबाबत

(१) ५२४० (२३-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) शहरात HRCT चाचणीसाठी भरमसाठ शुल्क आकारले जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात HRCT चाचणीसाठी पंधराशे रुपये आकारले जात असून यवतमाळ जिल्ह्यातील खाजगी रुग्णालय व लॅबमध्ये चाचणीसाठी साडेसहा हजार रुपये आकारून रुग्णांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यवतमाह जिल्ह्यातील खाजगी रुग्णालय व लॅबविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२५-०२-२०२२) : (१) हे खरे नाही. यवतमाळ शहरात HRCT तपासणी बाबत तक्रार प्राप्त नाही. फक्त यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील मेडीकेअर हॉस्पिटल बाबत तक्रार आहे.
(२) हे खरे नाही.
(३) यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील मेडीकेअर हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयात HRCT तपासणीचे अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याची तक्रार प्राप्त झाली असून त्यानुषंगाने सखोल चौकशीअंती निष्पन्न झाल्यानुसार आकारले अतिरिक्त शुल्काची रक्कम संबंधित सर्व रुग्णांना परत केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अल्पसंख्यांक शाळांमधील वीस विद्यार्थ्यांची असलेली अट शिथिल करण्याबाबत

(२) ५५९५ (१८-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक शाळांना अनुदान व शाळांमधील तुकड्या कायम ठेवण्यासाठी वीस विद्यार्थी असलेल्या अटीला शिथिलता द्यावी यासाठी शासनाने निर्णय घेण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या निर्णयानुसार सूचित केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सदरहू सूचनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (०७-०३-२०२२) : (१) व (२) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.९९६७/२०१३ मध्ये दिनांक १२/०८/२०१६ रोजी निर्णय देऊन मुल्यांकनाच्या दिनांक १५/११/२०११ च्या शासन निर्णयात दुरुस्ती करण्याबाबत निर्णय दिला आहे.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.११६३९-११६४०/२०१६ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/१२/२०१६ अन्वये अनुदानाच्या निकषासाठी शासन निर्णय, दिनांक १५/११/२०११ नुसार कार्यवाही करण्याबाबतचा आदेश देण्यात आला आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १२/०८/२०१६ च्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत

(३) ७४८८ (१५-०३-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य व केंद्र शासनाकडून दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीकरिता संबंधित महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून आवश्यक ती माहिती घेवून सामाजिक न्याय विभागाला वेळेत कळविणे अपेक्षित असते, परंतु सोलापूर जिल्ह्यातील २३६ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची माहिती वेळेत कळविलली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८ ते २०२० या शैक्षणिक वर्षात केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क या योजनेंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी संकेतस्थळाव्दारे शिष्यवृत्ती मंजूर झाली त्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात सदर शिष्यवृत्ती रक्कम जमा होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागाने दिनांक २ फेब्रुवारी, २०२० रोजी प्रथम स्मरणपत्र, दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० रोजी दुसरे स्मरणपत्र देऊनही सोलापूर जिल्ह्यातील २३६ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक चुकीचे असणे, बँक खात्यास आधारकार्ड संलग्नित नसणे, बँक खाते निष्क्रिय असणे इत्यादी त्रुटींची पुर्तता वेळेत केली नाही, सदर महाविद्यालयांनी वेळेत माहिती दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक ८ डिसेंबर, २०२० रोजी समाजकल्याण आयुक्त यांनी पुणे येथे झालेल्या बैठकीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय असलेली शिष्यवृत्ती अदा करण्यास झालेल्या विलंबास संबंधित महाविद्यालये कारणीभूत असून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वा फ्री शिपची रक्कम न मिळाल्यास महाविद्यालयाचे संस्थांचालक व प्राचार्य जबाबदार राहतील असे कारणे दाखवा नोटीसीतून बजावले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर जिल्हयातील २३६ महाविद्यालयांपैकी कारणे दाखवा नोटीसीबाबत १८ ते २० महाविद्यालयांकडून खुलासे प्राप्त झाले असून महाविद्यालयांनी शिष्यवृत्तीसंदर्भात विद्यार्थ्यांकडून हवी ती माहिती गोळा करुन कार्यालयात वेळेत पुरवणे आवश्यक असतानाही माहिती वेळेत न देणाऱ्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (१६-०३-२०२२) : (१) होय, अंशत खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, खरे नाही.

(४) होय, खरे आहे.

(५) सोलापूर जिल्हयातील ज्या महाविद्यालयांना याबाबतीत कारणे दाखवा नोटीसी बजावण्यात आलेल्या होत्या परंतु याबाबत ज्या महाविद्यालयांनी खुलासे सादर केलेले नाहीत, त्या महाविद्यालय प्रशासन व संबंधित शिष्यवृत्ती कार्यासनाविरुध्द त्यांनी केलेल्या दिरंगाईबद्दल अनुसूचित जाती अधिनियम, १९८९ अन्वये कार्यवाही करणे निर्देशित असल्याचे नमूद करुन प्रलंबित अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना तात्काळ सूचना देण्याचे निर्देश सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर, विद्यापीठ यांना दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू (जि.पालघर) येथे केंद्रीय अर्थसहाय्य लागवड योजनेंतर्गत निधी वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

(४) ८१७२ (१६-०३-२०२१) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय अर्थसहाय्य लागवड योजनेंतर्गत कृषी विभाग डहाणू (जि.पालघर) यांच्याकडून सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात मोगरा लागवडीसाठी अनुदान म्हणून डहाणू तालुक्यात १२९ शेतकऱ्यांना वितरित केलेल्या ५६ लाखांच्या निधी वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार पालघर जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांचेकडे दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०२-०३-२०२२) : (१) अशा प्रकारची तक्रार आढळून आलेली नाही. तथापि, आदिवासी विकास विभागांतर्गत विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत सन २०१५-२०१६ या वर्षात मंजूर निधीतुन डहाणू तालुक्यात १२९ शेतकऱ्यांना मोगरा लागवडीसाठी योजना मंजूर झाली आहे. त्यापैकी मोगऱ्याची लागवड केलेल्या ९६ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरणाद्वारे त्यांचे बँक खात्यात अनुदान जमा केले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

जिल्हा सामान्य रूग्णालय, परभणी येथील अधीक्षकांच्या यांचे जात प्रमाणपत्र व इतर गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत

(५) ८७०९ (१०-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रूग्णालय, परभणी येथील अधीक्षक यांचे जात प्रमाणपत्र व इतर गैरप्रकाराच्या अनुषंगाने मुद्देनिहाय चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांनी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांच्याकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यावर जात प्रमाणपत्र व इतर प्रकरणाच्या अनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२८-०२-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

श्री.बालाजी काळे पाटील कार्यकारी संपादक लोकपुकार यांचे दिनांक १६/१०/२०१४ रोजीच्या पत्रानुसार जिल्हा रुग्णालय, परभणी येथील सहाय्यक अधीक्षक यांची जात प्रमाणपत्र व इतर गैरप्रकाराच्या अनुषंगाने तक्रार केली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी येथील संबंधित अधीक्षक यांचे जातवैधता प्रमाणपत्र हे त्यांच्या नियुक्ती पूर्वीचे होते. त्या आधारे त्यांना नियुक्ती देण्यात आली होती. सदर जात वैधता प्रमाणपत्र उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ३०/०७/२०२१ च्या पत्रानुसार पुर्न:तपासणीसाठी सदस्य सचिव, अनुसूचित जाती जात वैधता तपासणी समिती, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे पाठविलेला आहे. परंतु अद्यापपर्यंत त्यांचेकडून अहवाल प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिन्नर रुग्णालय (जि.नाशिक) येथील रुग्णांना कागदोपत्री रेमडेसिविर दिल्याच्या प्रकरणातील चौकशी अहवालाबाबत

(६) ८८५४ (१५-०७-२०२१) श्री.नरेंद्र दराडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर रुग्णालय (जि.नाशिक) येथील रुग्णांना कागदोपत्री रेमडेसिविर दिल्याच्या प्रकरणात अधिक्षिका डॉ.वर्षा लहाडे यांच्या कामकाजाबाबत त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अहवालातील निष्कर्षानुसार दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (१४-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालातील निष्कर्षानुसार संबंधितांविरुध्द उचित कारवाई करण्यात येईल.

औरंगाबाद शहरातील भारत सेवक समाज संस्था (औरंगाबाद) बेकायदेशीररित्या अभ्यासक्रमाचे बोगस प्रमाणपत्र देत असल्याबाबत

(७) १००६७ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील भारत सेवक समाज संस्थेचे मागील दोन वर्षापूवीचे डीएमएलटी अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र रुपये ३० हजार, जीएनएमचे रुपये ६० हजार, बी.एस्सी, नर्सिंगची पदवी रुपये १ लाख २५ हजारांना उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मणिपूर राज्यातील संगाई इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या डीएमएलटी पदवीसाठी रुपये ७ हजार, बी.एस्सी पदवीसाठी रुपये ६० हजार, नर्सिंगसाठी रुपये ९० हजार, एमबीए पदवीसाठी रुपये १ लाख २५ हजार आकारण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्किलमीट संस्थेची औरंगाबादसह कल्याण, नेरुळ, अंबाडी, वाडा, भिवंडी, अकोला इ. ठिकाणी कार्यालये असल्याचेही निदर्शनास आले असून सदरहू प्रमाणपत्राचा उपयोग शासकीय नोकरी मिळविण्यासाठी करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीररित्या अभ्यासक्रमाचे बोगस प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (१७-०२-२०२२) : (१), (२), (३) व (४) नाही, हे खरे नाही.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी कोणतीही तक्रार / निवेदन शासनास प्राप्त झाल्यास सदर संस्थेवर कृषी,पशु व मत्स्य विज्ञान,उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनाधिकृत अभ्यासक्रम (प्रतिबंध) कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

इतर मागासवर्ग समाजाला आरक्षण, सवलती व लाभ मिळण्याकरिता गठीत केलेल्या उपसमितीच्या अहवालाबाबत

(८) १०१९४ (२९-०९-२०२१) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागासवर्ग समाजाच्या आरक्षण व आतापर्यंत शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलतींचा व इतर लाभांचा अभ्यास करून परिणामकारक कार्यान्वयन होण्याच्या दृष्टीने, तसेच अतिरिक्त सवलती/लाभ प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने अभ्यास करून मंत्रिमंडळाला शिफारस करण्यासाठी दिनांक

१६ ऑक्टोबर, २०२० रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयान्वये मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मंत्रिमंडळ उपसमितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालात सादर करण्यात आलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे व शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (०२-०३-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशी मुख्यत्वे करुन विविध संवर्गातील रिक्त पदे भरणे, पदोन्नती देणे, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, वसतिगृहास मान्यता, लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देणे, विशेष योजना राबविणे इत्यादी स्वरुपाचे आहेत. सदर शिफारशी संबंधित विभागांना त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या शिफारशीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता शासन पत्र दिनांक २५/११/२०२१ अन्वये कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिक्षणातील मुलींची टक्केवारी वाढावी यादृष्टीने सुरु करण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेचा लाभ बहुतांश विद्यार्थिनीना मिळण्याबाबत.

(९) १०२६५ (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षणातील मुलींची टक्केवारी वाढविण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेत वाढ होण्याऐवजी घट होत असल्याचे ग्रामीण भागात माहे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या जळगांव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील मुलींना सदर सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेचा लाभ न मिळाल्याने पालक वर्गातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शिक्षण क्षेत्रात मुलींची टक्केवारी वाढावी तसेच उक्त शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मिळणारा शिष्यवृत्तीचा लाभ राज्यातील विद्यार्थीनींना नियमितपणे मिळावा व शिष्यवृत्तीत वाढ करावी या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (१६-०३-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर योजना ही ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येते. या योजनेमध्ये जिल्हास्तरावरुन विद्यार्थीनींच्या आधारसंलग्न वैयक्तिक बँक खात्यावर NEFT व्दारे रक्कम वर्ग करण्यात येते. या दरम्यान विद्यार्थीनीचे बँक खाते बंद असणे किंवा खाते क्रमांक चुकीचा असणे अशा अडचणीमुळे शिष्यवृत्ती विद्यार्थीनींच्या बँक खात्यावर वर्ग करण्यास विलंब होण्याची शक्यता राहते.

विद्यार्थीनींच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्यातील बोगस डॉक्टरांबाबत

(१०) १०२७५ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हजारो बोगस डॉक्टर आल्याचे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी आणि युनानी अशा पॅथीमध्ये शिक्षण घेतलेल्या आणि त्या-त्या पॅथीच्या कौन्सिलकडे नोंदणी असलेल्यांनाच डॉक्टरकी करता येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णांची फसवणूक करणाऱ्या राज्यातील वैद्यकीय शिक्षण न घेतलेल्या आणि नोंदणी नसलेल्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (१५-०२-२०२२) : (१) नाही.
(२) होय.
(३) होय, पोलीस खात्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार राज्यामध्ये आतापर्यंत ८८ बोगस डॉक्टरांवर ७६ गुन्हे संबंधित पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आले आहेत.

तसेच बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर पोलिसामार्फत कारवाई करण्यासाठी या विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०५/०९/१९९१, ०७/०२/२००० व ०५/१२/२००१ अन्वये जिल्हा, तालुका, महानगरपालिका, नगरपरिषद इत्यादी यांच्या स्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यानुसार बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिनांक १५/१२/२०२१ च्या पत्रान्वये पुनश्च सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

टाटा मेमोरियल रुग्णालय तसेच राज्याच्या इतर भागातील रुग्णालयामध्ये रक्ताचा तुटवडा असल्याबाबत

(११) १०३१९ (०६-०१-२०२२) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परेल (मुंबई) येथील कर्करोगावर उपचारासाठी प्रसिध्द असलेले टाटा मेमोरियल रुग्णालयामध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने येथील रुग्णांना

आवश्यक असलेल्या रक्ताच्या पुरवठ्यासाठी टाटा रुग्णालयाच्यावतीने रक्तदात्यांना आवाहन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासाठी राज्य रक्त संक्रमण परिषदेने पत्रव्यवहार केल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने टाटा मेमोरियल रुग्णालयात तसेच राज्याच्या इतर भागातील रुग्णालयामध्ये रक्ताची उपलब्धता होण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (०५-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) रक्ताचा तुटवडा विचारात घेऊन अधिष्ठाता, टाटा मेमोरियल रुग्णालय यांनी समाजमाध्यमांवर रक्तदात्यांना रक्तदानाचे आवहान केले होते. तसेच राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत सर्व राजकीय, सामाजिक धार्मिक संस्था, गृहनिर्माण संस्था यांना रक्तदान शिबीरे आयोजीत करण्याविषयी आवाहन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे एका रक्तकेंद्रात जादा असलेले रक्त दुसऱ्या गरज असलेल्या रक्तकेंद्रामध्ये पाठविण्याविषयी सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार रक्तदान शिबीरे आयोजीत करण्यात आली होती व रक्ताची तुट भरुन काढण्यास मदत झाली.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

जायकवाडी धरणाच्या गॅलरीतील डी.पी.डी. चे काम मंजूर करण्याबाबत

(१२) १०४१४ (०६-०१-२०२२) श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरण सुरक्षा संघटना, नाशिक यांनी जायकवाडी धरणाच्या गॅलरीतील उर्वरित डी.पी.डी. चे काम मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ एप्रिल, २०२१ रोजी मा.जलसंपदामंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने धरण सुरक्षा संघटना, नाशिक यांनी जायकवाडी धरणाच्या गॅलरीतील उर्वरित डी.पी.डी. चे काम मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (१०-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षा संघटना,नाशिक यांनी जायकवाडी धरणाची दिनांक १०/१०/२०१९ रोजी तपासणी केली असून, त्यांनी जायकवाडी धरणाच्या इन्स्पेक्शन गॅलरी मधील सच्छिद्र नलिका (व्ही.पी.डी.) साफ करण्याचे काम करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर जायकवाडी धरणावरील एकूण १८० सच्छिद्र नलिकापैकी तातडीची अत्यावश्यक ६० नलिकांची कामे पूर्ण केली आहेत. जायकवाडी प्रकल्प हा जागतिक बँक अर्थसहाय्यित धरण पुनर्स्थापना व सुधारणा टप्पा-२ (DRIP) अंतर्गत घेण्यात आला असून उर्वरित सच्छिद्र नलिकांची कामे धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यास मान्यता घेऊन सदरील कामे करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सत्यम रुग्णालयात रुग्णांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत

(१३) १०८१२ (०६-०१-२०२२) श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील एलआयजी कॉलनीत राहणारे श्री.मावळे यांना कोरोनाची लागण झाल्याने त्यांना त्याच परिसरातील सत्यम रुग्णालयात माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान उपचारार्थ दाखल करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णाचे उपचारादरम्यान निधन झाल्याने रुग्णालय व्यवस्थापनाने रुग्णाच्या उपचाराचे रुपये दोन लाख जमा केल्याशिवाय मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देणार नसल्याची भूमिका घेतली असून रुग्णालय व्यवस्थापनेकडून रुग्णांच्या कुटुंबियांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशाप्रकारे रुग्णांच्या कुटुंबियांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२५-०२-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

श्री.मावळे यांना कोरोनाची लागण झाल्याने सत्यम रुग्णालयात उपचारार्थ दिनांक १८/०४/२०२१ रोजी दाखल करण्यात आले होते.

(२) अंशत: खरे आहे. उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू झाला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्ण मृत्यू पावल्याचे कळविल्यानंतर त्यांनी हॉस्पिटलमध्ये गोंधळ घातल्यामुळे मृतदेह पाठविण्यास थोडासा विलंब झाला. परंतु बिलासाठी मृतदेह अडवून ठेवण्याचा हॉस्पिटलचा कोणताही हेतु दिसून आलेला नाही.

(३) खाजगी रुग्णालयातील रुग्णांच्या वैद्यकीय बिलांचे लेखापरीक्षण करण्यासाठी पनवेल मनपा हद्दीत उपजिल्हाधिकाऱ्यांच्या नियत्रंणाखाली लेखापरिक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे. या लेखापरीक्षणात श्री.मावळे यांच्या वैद्यकीय बिलामध्ये रुपये ४७,५००/- अधिक आकारल्याचे आढळून आले आहे. तथापि, श्री.मावळे यांच्या नातेवाईकांनी रुग्णाच्या एकूण रुपये १,५८,२३६/- या बिलापैकी केवळ रुपये ३०,०००/- एवढी रक्कम रुग्णालयाकडे जमा केले असून उर्वरित रक्कम जमा केलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील महिला बचतगटांना आर्थिक सहाय्य मिळणाबाबत

(१४) १११६४ (०६-०१-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला बचतगटांना रुपये २ लाख आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्ज घेण्याच्या अटीनुसार ज्या सभासदांना कर्ज पाहिजे आहे त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेकडून किमान दोन वेळा कर्ज घेऊन ते परतफेड केले पाहिजे अशी अट घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बचतगटांना शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार रुपये २ लाखाचे कर्ज घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक सहाय्यतेपासून वंचित रहावे लागत आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार आतापर्यंत किती महिला बचतगटांनी आर्थिक सहाय्य मिळण्यासंदर्भात अर्ज दाखल केले आहेत तसेच, किती बचतगटांना आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे व किती बचतगट प्रलंबित आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) : (१) हे खरे नाही. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता समुहांना सन २०१२ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या नियमावलीनुसार कर्ज देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार आतापर्यंत ७,५५,००७ महिला बचतगटांनी आर्थिक सहाय्य मिळण्यासंदर्भात अर्ज दाखल केलेले असून एकूण ७,३२,७८८ बचतगटांना रक्कम रुपये ११६५८ कोटी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे व २२,२१९ बचतगटांची बँक कर्ज प्रक्रिया चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जलसंपदा विभागाच्या खाजगीकरणाबाबत

(१५) ११२३९ (०६-०१-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या एकत्र आकृतीबंधाचा अभ्यास करून विभागाचे खाजगीकरण करण्याबाबतचा अहवाल शासनाने अंतिम मंजुरीसाठी वित्त विभागाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाचे खाजगीकरण झाल्यास वर्ग “क” व “ड” पदांची भरती बंद होणार असून १० ते १५ हजार कर्मचारी बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वाढणाऱ्या बेरोजगारीसंबंधी शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.जयंत पाटील (१७-०३-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) वित्त विभागाच्या दिनांक ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयानुसार नवीन पदनिर्मिती पूर्णपणे बंद करण्यात आली असून पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ७५% पर्यंत पदे भरण्यात मुभा देण्यात आलेली आहे. विभागाचा सुधारित आकृतिबंध वित्त विभागात सादर करण्यात आला आहे. सदर बाबतीत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातील व्यवस्थापकीय संचालकांची नेमणूक करण्याबाबत

(१६) ११२४२ (०६-०१-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातील व्यवस्थापकीय संचालकपद रिक्त असून महामंडळाद्वारे घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्यांच्या कर्जावरील व्याजाचा परतावा महामंडळाकडून केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचार व्यवस्थापकीय संचालक नसल्याकारणाने कर्ज लाभार्थ्यांना तीन महिन्यांपासून नियमित कर्ज फेडूनही परतावा मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्यवस्थापकीय संचालकांच्या नेमणुकीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार (१६-०३-२०२२) : (१) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातील 'व्यवस्थापकीय संचालक' हे पद रिक्त नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना(IR-I) गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत व्याज परताव्याचा लाभ लाभार्थ्यांना देत आहे.
(२) हे खरे नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत नियमित व्याज परताव्याचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येत आहे.

दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासून आजतागायत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने योजनांतर्गत जवळपास रुपये ३४,४५,५१,०७६/- इतकी रक्कम तर योजनेच्या सुरुवातीपासून आजपर्यंत रुपये १९०.०० कोटी पेक्षा अधिक रकमेचे वितरण केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रुप ग्रामपंचायत, रामराज (ता.अलिबाग, जि.रायगड) हद्दीतील स्मशानभूमीला संरक्षण भिंत बांधण्याबाबत

(१७) ११७४६ (०५-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रुप ग्रामपंचायत, रामराज (ता.अलिबाग, जि.रायगड) हद्दीतील नदीलगत असलेल्या स्मशानभूमीत पावसाळ्यात पाणी शिरत असल्याने प्रेत दहन करताना स्थानिक नागरिकांना अनेक अडचणी येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू नदीलगत असलेल्या स्मशानभूमीला संरक्षण भिंत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) रामराज गांव, ता.अलिबाग हे गांव खाडीकिनारी सखल भागात वसलेले आहे. पावसाळ्यात येथील खाडीला मिळणाऱ्या नद्यांना पूर येत असल्याने पुराचे पाणी व समुद्राला येणारी भरती यामुळे गावाला पाण्याचा वेढा पडतो. यादरम्यान नदीकिनारी असणाऱ्या स्मशानभूमी पाण्याखाली जातात ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर गावातील रामराज मोहल्ला ते रामराज बस स्टँड या भागास संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. तसेच गावातील स्मशानभूमीपैकी कोळी समाजाच्या स्मशानभूमीला खाडीकिनारी संरक्षक भिंत बांधून पूर्ण झाली आहे.

बीड जिल्ह्यातील शोष खडड्यांच्या कामाबाबत

(१८) ३३२१५ (१८-०८-२०१७) श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात डास मुक्ती अभियान राबविण्यासाठी जिल्ह्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नांदेड जिल्ह्यात अभ्यास दौरा आयोजित केला होता, खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभ्यास दौऱ्यावर किती खर्च करण्यात आला व या अभ्यास दौऱ्यानंतर बीड जिल्ह्यात दिनांक १० जून, २०१७ अखेर किती शोष खडड्यांची कामे पूर्ण झाली आहेत ?

श्री.राजेश टोपे (२५-०२-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आवाहनानंतर जिल्हा परिषद, बीड अंतर्गत गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (प.) व तांत्रीक कर्मचारी यांना नांदेड जिल्ह्यातील डास मुक्त गावाच्या पाहणी

करण्यासाठी भेट दिलेली आहे. सदरचा दौरा हा स्वयंस्फुर्तीने व स्वखर्चाने करण्यात आला होता. सदर दौऱ्यासाठी शासकीय खर्च करण्यात आलेला नाही. दिनांक २० जून, २०१७ अखेर शोषखड्याची एकूण ३१४१ इतकी कामे प्रगतीपथावर होती. ती सद्य:स्थितीत पूर्ण झालेली आहेत.

राज्यभरात विविध संवर्गाच्या संघटनांना शासनाची मान्यता नसल्याबाबत

(१९) ४७२४५ (०५-०७-२०१९) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात मोठ्या संख्येने सदस्य असलेल्या शिक्षकांसह विविध संवर्गाच्या संघटनांना शासनाची मान्यता नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संवर्गाच्या संघटनांना मान्यता नसल्याने कर्मचारी संघटना अडचणीत आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२५-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी वस्तुस्थिती निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गर्भपाताच्या गोळया काळया बाजारात विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(२०) ४७६७३ (०५-०७-२०१९) डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील औषधविक्रेत्यांकडे मागील सहा महिन्यांपासून गर्भपाताच्या गोळया उपलब्ध नसून काही औषधविक्रेत्यांकडून गर्भपाताच्या

गोळया काळया बाजारात विकल्या जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच काही ठिकाणी डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गर्भपाताच्या गोळया विकल्या जात असल्याचे निदर्शनास आले असून सदर औषध विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गर्भपात करणाऱ्या रुग्णांना औषधविक्रेत्यांकडे गोळया उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करुन काळया बाजारात औषध विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे (२९-११-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, काही ठिकाणी गर्भपाताच्या गोळ्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय परवानाधारक औषधी विक्रेता किंवा विनापरवानाधारक व्यक्तींद्वारे विक्री होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने संबंधितांविरुध्द परवाना निलंबन, पोलिसात गुन्हे दाखल करणे इत्यादी कारवाया केल्या जात आहेत.
(३) स्त्रीरुग्ण तज्ञ डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शनवर गर्भपाताच्या गोळ्या औषध विक्रेत्यांकडे उपलब्ध असल्याचे अन्न व औषध प्रशासनास आढळून आले आहे. तसेच विनाप्रिस्क्रिप्शन विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर आणि काळाबाजार करणाऱ्या दोषिंविरुध्द परवाना निलंबन, परवाना रद्द, पोलिसांत गुन्हे दाखल करणे इत्यादी कारवाया केल्या जात आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **श्री.राजेन्द्र भागवत**
मुंबई. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.